WWW.TAXSCAN.IN

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ७, अंक ७५] गुरुवार, जून १७, २०२१/ज्येष्ठ २७, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

### वित्त विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ जून २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५.**

क्रमांक व्यकर-१२२१/प्र.क्र.१६/कराधान-३.—महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) च्या कलम ६ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र. व्यकर. २०१४/प्र. क्र. ३८/कराधान-३, दिनांक २१ ऑगस्ट २०१४ मध्ये, खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूचीमधील, नोंद क्र. (८) मध्ये,—

(एक) स्तंभ (क) मध्ये, सध्या अस्तित्वात असलेल्या भागास खंड (एक) असे नव्याने क्रमित करण्यात येत आहे, आणि अशा प्रकारे नव्याने क्रमित केलेल्या खंड (एक) नंतर, खालील खंड दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"(दोन) मार्च २०२१, एप्रिल २०२१ आणि मे २०२१ या महिन्यांची विवरणे.";

(दोन) स्तंभ (ई) मध्ये,—

(क) अट क्र. (अ) मध्ये, "स्तंभ (क) मध्ये" या शब्द, कंस आणि अक्षरा नंतर ", खंड (एक) मध्ये", हे शब्द आणि कंस दाखल करण्यात येत आहेत ;

(ख) अट क्र. (अ) नंतर खालील अट दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"(अ-१) स्तंभ (क) मध्ये, खंड (दोन) मध्ये, विनिर्दिष्ट केलेले विवरण दिनांक ३० जून २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागाच्या संकेतस्थळावर दाखल करावे.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मंदार केळकर,**
शासनाचे उप सचिव.

WWW.TAXSCAN.IN



## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated the 17th June 2021.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

No. PFT 1221/C.R. 16/Taxation-3.- In exercise of the powers conferred by proviso to sub-section *(3)* of section 6 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975), the Government of Maharashtra, hereby amends the Government Notification, Finance Department No. PFT-2014/CR 38/Taxation-3, dated the 21st August 2014, as follows, namely :—

In the SCHEDULE, appended to the said Notification, in entry (8),—

(*i*) in column (*c*), the existing portion shall be renumbered as clause (*i*) thereof, and after clause (*i*) as so renumbered, the following clause shall be added, namely :—

"(*ii*) Returns for the months of March 2021, April 2021 and May 2021."

(*ii*) in column (*e*),—

(*a*) in condition (*a*), after the words, bracket and letter "in column (*c*)" the words, bracket and letter ", in clause (*i*)" shall be inserted ;

(*b*) after condition (*a*), the following condition shall be inserted, namely :—

"(*a-1*) Return specified in column (*c*), in clause (*ii*) shall be filed on or before 30th June 2021 on the website of the Maharashtra Goods and Services Tax Department.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANDAR KELKAR,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.